# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## Office of the Director Students' Welfare

Dr.I.S. Mohurley
Director
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : director.studentwelfaregug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/DSW/188/2015

Dt:28/ 11/2015

प्रति,

मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय:- दि. २६ नोव्हेंबर हा दिवस ''संविधान दिवस'' म्हणून साजरा करण्याबाबत.**

संदर्भ:- पत्र क्र. उशिस/२०१५/संविधान दिवस/म वि-१/ ११९७८, दि. १९/११/२०१५ उच्च शिक्षण संचालणालय, महाराष्ट्र शासन.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाधिन पत्राचे कृपया अवलोकन करावे व त्यानुसार कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीबाबतचा एकत्रीत अहवाल संचालक विद्यार्थी कल्याण यांचे कार्यालयास कार्यक्रमानंतर लगेच निवडक फोटो व पेपर कात्रणासह अविलंब सादर करावा, हि विनंती.

कळावे,

धन्यवाद!

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
संचालक विद्यार्थी कल्याण

संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**सहपत्रे: वरीलप्रमाणे**

# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं. ०२० / २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९. फॅक्स नं.- ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/२०१५/ संविधान दिवस /मवि-१ /11978

दिनांक- १९/११/२०१५

प्रति,

१) विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, सर्व विभाग.

२) कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.


गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 060 दि. 23/11/15
जावक क्र. 8013 दि. 23/11/15


**विषय :- दि.२६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान दिवस" साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १. शासन पत्र क्र. संकीर्ण- ११११/( प्र.क्र. १५१/१५) /समन्वय , दि.०७.११.२०१५
२. शासन निर्णय क्र.जपुति २२०८/१३३८/प्र.क्र.१०९/०८/२९, दि.२४.११.२००८

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.(प्रत संलग्न) भारतीय संविधानाबाबत जनजागृती आणि सर्व नागरिकांना संविधानाची ओळख व्हावी या करिता राज्यात दरवर्षी दि.२६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान दिवस" म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या दिवशी घ्यावयाच्या कार्यक्रमांबाबत खालीलप्रमाणे निर्देश शासनाने दिलेले आहेत.

१) महाविद्यालयांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे (Preamble)(परिशिष्ट-१) सामूहिक वाचन करावे.

२) संविधानाबाबत जनजागृती व्हावी या करिता महाविद्यालयांमार्फत संविधान यात्रा काढण्यात यावी. यामध्ये संविधानाची प्रास्ताविका , मूलभूत हक्क, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इ.महत्त्वाची कलमे ठळकरित्या दिसतील असे बॅनर्स, पोस्टर्स वापरावेत.

३) महाविद्यालयांमध्ये संविधान दिनाबाबत निबंध / भित्तीपत्रके / सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करावे.

आपल्या अधिनस्त सर्व महाविद्यालयांत उपरोक्त कार्यक्रम घेवून संविधान दिवस साजरा करण्याबाबतच्या सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात. तसेच महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीबाबतचा एकत्रित अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ. धनराज माने )
संचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य , पुणे- १

प्रत-

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

[illegible]

# भारताचे संविधान

## उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम

समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा

व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा

व उपासना यांचे स्वातंत्र्य;

दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता

यांचे आश्वासन देणारी बंधुता

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;

आमच्या संविधानसभेत

आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी

याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित

करुन स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

-----